क्र. १५६ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

६ ऑगस्ट २०२३

## सामान्यकाळातील अठरावा रविवार

### प्रस्तावना

ख्रिस्तसभा आज प्रभू येशूच्या रूपांतराचा सण साजरा करीत आहे. प्रभू येशूने ताबोर पर्वतावर आपल्या तीन निवडक शिष्यांना आपले वैभव प्रकट केले. रूपांतराच्यावेळी येशूचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले व त्याची वस्त्रे बर्फासारखी शुभ्र व चकचकीत झाली. अशावेळी आकाशातून दिव्य वाणी झाली की, हा माझा पुत्र मला परमप्रिय आहे. ह्याविषयी मी संतुष्ट आहे. ह्याचे तुम्ही ऐका. शिष्यांना प्रभूख्रिस्ताचे महात्म्य कळाले. शिष्यांप्रमाणेच आपल्याही जीवनाचे रूपांतर व्हावे व आपणांस ईश्वराच्या दिव्यत्वाची अनुभूती व्हावी म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वर बापा, तुझा पुत्र ख्रिस्त ह्याच्या दिव्य वैभवाचे संदेष्ट्यांना दर्शन घडवून तू आमचा विश्वास बळकट करतोस. त्याच्या वैभवदर्शनाने तू तुझ्या प्रिय पुत्रांच्या व कन्यांच्या भावी वैभवाचे आम्हाला दर्शन घडविले आहेस. तुझ्या पुत्राची वाणी आम्ही ऐकत आहोत. त्याच्याबरोबर सार्वकालिक जीवनाचे वारसदार होण्यास आम्हांला साहाय्य कर. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात एकच परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

### पहिले वाचन

**दानीएलच्या पुस्तकातून घेतलेले वाचन ७:९-१०.१३-१४**

**"त्याचा पेहराव बर्फासारखा पांढरा होता."**

मी पाहत असता आसने मांडण्यात आली आणि एक पुराणपुरुष आसनारूढ झाला. त्याचा पेहराव बर्फासारखा पांढरा होता, त्याच्या डोक्याचे केस स्वच्छ लोकरीसारखे होते. त्याचे आसन प्रत्यक्ष अग्निज्वालामय होते आणि त्या आसनाची चक्रे धगधगीत अग्निरूप होती. त्याच्यासमोरून अग्निप्रवाह वाहत होता. हजारो देवदूत त्याची सेवा करत होते, लाखो लोक त्याच्यासमोर उभे होते. न्यायसभा भरली, पुस्तके उघडली गेली. मी रात्रीच्या दृष्टांतात पाहिले इतक्यात पाहा, आकाशातील मेघांवर आरूढ होऊन मानवपुत्रासारखा कोणी आला, तो त्या पुराणपुरुषाकडे आला आणि त्यास त्यांनी त्याच्याजवळ नेले. सर्व लोक, सर्व राष्ट्रे आणि सर्व भाषा बोलणारे लोक, यांनी त्याची सेवा करावी म्हणून त्यास प्रभूत्व, वैभव आणि राज्य ही दिली. त्याचे प्रभुत्व अक्षय आणि अढळ आहे, त्याचे राज्य अविनाशी आहे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१:९**

**परमेश्वर राज्य करतो, तो साऱ्या भूतलावर परमश्रेष्ठ आहे.**

१. परमेश्वर राज्य करतो, पृथ्वी उल्हास करो, द्विपसमूह हर्ष करो. ढग आणि अंधार त्याच्याभोवती आहेत, नीती आणि न्याय त्याच्या राजासनाचा आधार आहेत. (प्र)

२. परमेश्वरासमोर, सर्व पृथ्वीच्या प्रभूसमोर पर्वत मेणाप्रमाणे वितळले. आकाश त्याची न्यायपरायणता जाहीर करते, सारी मानवजात त्याचे ऐश्वर्य पाहते. (प्र)

३. कारण हे परमेश्वरा, तूच साऱ्या भूतलावर परमश्रेष्ठ आहेस, सर्व दैवतांहून तू थोर आहेस. (प्र)

### दुसरे वाचन

**संत पेत्राने पाठवलेल्या दुसऱ्या पत्रातून घेतलेले वाचन १:१६-१९**

**"आकाशातून आलेली ही वाणी आम्ही ऐकली."**

चातुर्याने कल्पिलेल्या कथांस अनुसरून आम्ही आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे सामर्थ्य आणि आगमन ह्यासंबंधाने तुम्हांस कळवले असे नाही, तर त्याचे ऐश्वर्य प्रत्यक्ष पाहणारे होतो. कारण त्याला देवपित्यापासून सन्मान आणि गौरव मिळाला, तेव्हा ऐश्वर्ययुक्त गौरवाच्याद्वारे अशी वाणी झाली की, "हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे." त्याच्याबरोबर पवित्र डोंगरावर असताना आकाशातून आलेली ही वाणी आम्ही स्वत: ऐकली. शिवाय अधिक निश्चित असे संदेष्ट्याचे वचन आम्हाजवळ आहे, ते काळोख्या जागी प्रकाशणाऱ्या दिव्याप्रमाणे आहे. तुमच्या अंत:करणात दिवस उजाडेपर्यंत आणि पहाटेचा तारा उगवेपर्यंत तुम्ही त्याकडे लक्ष द्याल तर बरे होईल.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय १७:५**

**आलेलुया, आलेलुया !**

हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे,  
ह्याविषयी मी संतुष्ट आहे,  
ह्याचे तुम्ही ऐका.

**आलेलुया !**

### शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**१७:१-९**

**"येशूचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले."**

येशूने पेत्र, याकोब आणि त्याचा भाऊ योहान ह्यांना आपणाबरोबर एका उंच डोंगरावर एकांती नेले. तेव्हा त्याचे रूप त्यांच्यादेखत पालटले, त्याचे मुख सूर्यासारखे तेजस्वी झाले आणि त्याची वस्त्रे प्रकाशासारखी शुभ्र झाली. तेव्हा पाहा, मोशे, एलीया हे त्याच्याबरोबर संभाषण करत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले. मग पेत्र येशूला म्हणाला, "प्रभूजी, आपण येथे असावे हे आपल्याला बरे आहे. आपली इच्छा असली तर मी येथे तीन मंडप उभारतो. आपणासाठी एक, मोशेसाठी एक आणि एलीयासाठी एक." तो बोलत आहे तो, पाहा, तेजस्वी मेघाने त्यांच्यावर छाया केली आणि पाहा, मेघातून अशी वाणी झाली की, "हा माझा पुत्र,

मला परमप्रिय आहे, ह्याविषयी मी संतुष्ट आहे. ह्याचे तुम्ही ऐका.'' हे ऐकून शिष्य जमिनीवर पालथे पडले आणि फार भयभीत झाले. तेव्हा येशूने जवळ येऊन त्यांना स्पर्श करून म्हटले, ''उठा, भिऊ नका.'' तेव्हा त्यांनी दृष्टी वर करून पाहिले तो येशूशिवाय कोणी त्यांना दिसला नाही.

नंतर ते डोंगरावरून खाली येताना येशूने त्यांना आज्ञा केली की, ''मनुष्याचा पुत्र मेलेल्यातून उठवला जाईपर्यंत हा साक्षात्कार कोणालाही सांगू नका.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू**

ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या, तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

प्रतिसाद – **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. मरियेप्रमाणे चांगल्या गोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठी व ख्रिस्तसभेची शिकवण आचरणात आणण्यासाठी मार्गदर्शन करणारे आपले पोप फ्रान्सिस, बिशप, सर्व धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूची कृपा व आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय, सामाजिक व शासकीय अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी योग्यरितीने पार पाडावी व देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी नेटाने प्रयत्न करावा म्हणून आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करू या.

३. परमेश्वरी कृपेने आपल्याला अनेक दानं व कृपादानं लाभली आहेत त्याचा उपयोग त्याच्याच गौरवासाठी व कौटुंबिक जडणघडणीसाठी करून कुटुंबातील ऐक्य सुसंवादाद्वारे अधिक दृढ करावे, मुलांच्या अभ्यासावर परमेश्वराचा आशीर्वाद असावा, ईश्वरी हाकेला अनेकांनी प्रतिसाद द्यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. चांगले हवामान, चांगला पाऊस, अखंडित विज पुरवठा आपल्याला मिळावा व त्याद्वारे आपली शेती बागायती फुलावी, आपल्या श्रमावर व व्यवसायावर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आजारी, दु:खी, निराधार व बेरोजगार लोकांना प्रभूचा स्पर्श व्हावा, परगावी व परदेशी असणारे आपले बांधव सुरक्षित असावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू**

हे पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्याचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या रूपांतराने आमच्या ह्या भेटी पवित्र कर व त्याच्या तेजस्वी वैभवाने पापांपासून आमची मुक्तता कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, ख्रिस्ताच्या वैभवाच्या रूपांतराद्वारे तू त्याचे खरे तेज प्रकट केलेस. आम्ही स्वीकारत असलेल्या स्वर्गीय भाकरीमुळे आम्हाला त्याच्या प्रतिमेप्रमाणे बनव. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

परमेश्वराच्या दानशूरतेला मर्यादा नाही. आजच्या तिन्ही वाचनांमध्ये ह्या दानशूरतेचे तीन पैलू आपल्यापुढे सादर करण्यात आलेले आहेत.

**अ) परमेश्वर मानवाला वरदान देताना कुठलाही भेदभाव करीत नाही :** त्याची दया कशी अनंत आणि अपार आहे हे आजच्या पहिल्या वाचनातून (यशया ५५:१–३) दिसून येते. गरीब वा श्रीमंत अशा सर्वांना तो आपणाकडे बोलावीत असतो. त्याया प्रेमाचा आस्वाद कोणीही घेऊ शकतो. त्याच्या दारापुढे आलेला कोणताही याचक रिक्त हस्ते परतत नाही. हा तपशील वाचत असताना यशया ४०–५५ ची पार्श्वभूमी लक्षात घेणे गरजेचे आहे. इस्राएली लोक बाबिलोन येथे हद्दपार अवस्थेत असताना देव त्यांची विशेष काळजी घेतो. अरण्यात मान्ना पुरविणारा परमेश्वर आता हद्दपारीत असलेल्यांना सर्व काही पुरवितो.

**ब) परमेश्वर सर्वदा माणसाच्या गरजा पुरवीत असतो :** आजच्या दुसऱ्या वाचनात रोम.८:३५, ३७–३९) संत पौल रोमकरांस ख्रिस्ताच्या अगाध प्रीतीची जाणीव करून देतो. ह्या ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोणतीही नैसर्गिक आपत्ती, युध्दजन्य परिस्थिती, छळ वा मानहानी, दृश्य अथवा अदृश्य शक्ती, वर्तमान काळातील मोहपाश किंवा भविष्यकाळाची चिंता, विभक्त करू शकत नाही. आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये असलो तरी परमेश्वर आपल्या गरजा नेहमीच पुरवित राहणार आहे.

**क) परमेश्वर मानवाला भरभरून देत असतो :** शुभवर्तमानातील (मत्तय १४:१३–२१) पाच हजारांना भोजन देण्याच्या चमत्कारातील लोकांची संख्या आणि उरलेल्या तुकड्यांच्या टोपल्या परमेश्वराच्या असंख्य व अगणित उपकारांचे द्योतक आहे. मात्र ह्या बाह्य भरभराटीचे मूळ येशूच्या हृदयातील कळवळ्यामध्ये असते हे आपण ध्यानात घ्यायला हवे.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात मी परमेश्वराची अगाध दानशूरता कशा रीतीने अनुभवतो? इतरांप्रती उदार असण्यामध्ये माझ्या जीवनात कोणकोणते अडथळे आहेत? ●●●

| ऑगस्ट २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०७ | सं सिक्टस दुसरे आणि रक्तसाक्षी (हि/तां) | : गणना ११:४–१५/ मत्तय १४:१३–२१ |
| मंगळ ०८ | सं डॉमनिक (पां) | : गणना १२:१–१३/मत्तय १४:२२–३६ |
| बुध ०९ | सं एडिथ स्टीन (हि/तां) | : गणना १३:१,२,२५–१४:२६–२१, ३४–३५/मत्तय १५:२१–२८ |
| गुरू १० | सं लॉरेन्स, धर्मप्रसेवक (तां) | : गणना २०:१–१३/मत्तय १६:१३–२३ |
| शुक्र ११ | सं क्लेर (पां) | : अनुवाद ४:३२–४०/मत्तय १६:२४–२८ |
| शनि १२ | सं मायकल (हि) | : अनुवाद ६:४–१३/मत्तय १७:१४–२० |